# साय-फाय करंडकमध्ये 'वाट' एकांकिकेने मारली बाजी

**पुणे** : क्विक हील फाऊंडेशन आणि पुणे पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साय-फाय करंडक २०१७' मध्ये प्रारंभ संस्थेतर्फे सादर झालेल्या 'वाट' या एकांकिकेने प्रथम पारितोषिक प्राप्त करीत बाजी मारली.

तसेच, अनबॉक्स संस्थेच्या 'फोर्थ डायमेंशन' या एकांकिकेने व्दितीय आणि जाकरंडा संस्थेच्या 'मिशन परफेक्शन' या एकांकिकेने सांघिक उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. त्याशिवाय, या स्पर्धेत दिग्दर्शनाचे पारितोषिक अभिजित झुंजारराव (आयडीज) यांनी, पुरुष अभिनयाचे प्रथम पारितोषिक तुषार कोळेकर (वाट, भूमिका निळ्या), स्त्री अभिनयाचे प्रथम पारितोषिक सोनाली मगर (आयडीज) यांनी प्राप्त केले.

विजेत्यांना क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर, क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, सायबर क्राईम पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ, प्रदीप वैद्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी अभिनेता सुयश टिळक, अभिनेत्री पर्ण पेठे, लेखक-दिग्दर्शक गिरीश जोशी, सुनील सुकथनकर उपस्थित होते. साय-फाय करंडक स्पर्धेत पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा व नागपूर या सहा प्राथमिक केंद्रांचा समावेश होता. अभिनेता आलोक राजवडे व अश्विनी गिरी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.